अतारांकित प्रश्नोत्तरांची ९६ वी यादी

महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

खडकवासला (ता. हवेली, जि.पुणे) येथील लघू पाटबंधारे विभाग, पुणे जिल्हा परिषद अंतर्गत विविध कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

(१) ११३५५ (११-०९-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) येथील लघू पाटबंधारे (छो.पा.) विभाग, पुणे जिल्हा परिषद यांच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लघु पाटबंधारे (छो.पा.) विभागाच्या सन २०१८ ते माहे जून, २०२० मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या कामांची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंकरराव गडाख (२३-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

आंतरराज्य प्रकल्प दुधगंगा (काळम्मावाडी) (जिल्हा कोल्हापूर) प्रकल्पातील डावा कालव्याच्या कामात झालेला अपहार

(२) ३३२०२ (०५-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंतरराज्य प्रकल्प दुधगंगा (काळम्मावाडी) (जिल्हा कोल्हापूर) प्रकल्पाच्या डावा कालवा क्र.३२ ते ७६ मधील माती काम, अस्तरीकरण व बांधकामाच्या कामाची स्वतंत्र विशेष दक्षता पथक नेमून फेरचौकशी करून संबंधीत दोषी अधिकारी व ठेकेदार यांचेवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जलसंपदा मंत्री महोदय यांचेकडे दिनांक १४ डिसेंबर २०२० रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अधिक्षक अभियंता दक्षता पथक पुणे यांनी दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनाने पत्रान्वये चौकशी करून त्याबाबतचा अहवाल शासनास तात्काळ सादर करण्याबाबत सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अस्तरीकरणाचे १२५ कोटी रुपयांचे काम २२ वर्षांपासून एका विशिष्ट ठेकेदाराला देऊन त्यामध्ये मुदतवाढ देत प्रकल्पाची किंमत ३५० कोटी रुपयांपर्यंतची वाढ करून ही अद्याप पुर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त चुकीच्या पध्दतीने मुदतवाढ देणाऱ्या संबंधीत दोषी अधिकारी व ठेकेदार यांचे दिरंगाईमुळे शेतकऱ्यांच्या शेतीस वेळेत सिंचन व्यवस्था मिळाली नसल्याने शासकीय निधीचा अपव्यय झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू अस्तरीकरणाचे काम चुकीच्या पद्धतीने करणाऱ्या संबंधीत अधिकारी व ठेकेदार यांचेवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (०९-०३-२०२२) : (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

दुधगंगा डावा कालवा किमी ३२ ते ७६ या कामाची स्विकृत निविदा किंमत रु.१२२.९६ कोटी इतकी असून निविदा क्र.ब-१/मुअ/०६ सन २०००-०१ अन्वये नियमोचित निविदा प्रक्रियेद्वारे हे काम मे.पी.व्ही.रेड्डी, हैद्राबाद व अविनाश कन्स्ट्रक्शन, पुणे (सं.अ) यांना देणेत आले आहे. सदरील काम हे सन २००१ पासून प्रगतीपथावर आहे. निधीची अनुपलब्धता, भुसंपादनातील अडचणी, प्रकल्पग्रस्तांचा होणारा विरोध यामुळे या निविदेतील कामे वेळेत पुर्ण करता आले नाही. सद्यस्थितीत या कामावर रु.२३५.०६ कोटी इतका खर्च झाला असून त्यामध्ये कामाप्रित्यर्थ रु.१६२.३४ कोटी व भाववाढीसाठी रु.७२.७३ कोटी इतक्या रकमेचा अंतर्भाव आहे.

(४) नाही.

जून-२०१२ अखेर किमी ३२ ते ४२ या टप्प्यात आणि डिसेंबर २०१८ अखेर कि.मी.४२ ते ४८ पर्यत कालवा प्रवाहित करण्यात आला असून सध्या किमी ४८ पर्यत शेतीसाठी सिंचनाचा लाभ मिळत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

___

रत्नागिरी जिल्हयातील दापोली मतदार संघातील अपूर्ण पाटबंधारे योजना पूर्ण करण्यास निधी मिळणेबाबत

(३) ३३४३४ (०५-०१-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील दापोली मतदार संघातील पोयनार लघुपाटबंधारे योजना, न्यू मांडवे लघुपाटबंधारे योजना या अपूर्ण पाटबंधारे योजना पूर्ण करण्यासाठी निधी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक. २८.९.२०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (०९-०५-२०२२) : (१) होय.

(२) मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक २४.९.२०२० ते दिनांक १.१०.२०२० या कालावधीमध्ये उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण व मराठवाडा विभागातील आमदारांसमवेत आढावा बैठका घेतल्या. त्यादरम्यान, मा.सदस्य यांनी दिलेल्या निवेदनानुसार मा.मंत्री (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) महोदयांच्या स्वाक्षरीने मा.विधानसभा सदस्य श्री.योगेशदादा कदम यांना दि.१२.७.२०२१ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदर निवेदनातील पोयनार ल.पा. प्रकल्पाचे काम सुप्रमा अभावी आणि न्यू मांडवे ल.पा प्रकल्पाचे काम घटक बाबींचे सविस्तर संकल्पना अभावी संस्थगित आहे.

दोन्ही प्रकल्पांची कामे सुप्रमा मंजुरी व निधीच्या उपलब्धतेनुसार सन २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पारोळा (जि.जळगांव) येथील पंचायत कर्मचारी निवासस्थानाची दुरावस्था झाल्याबाबत

(४) ३५३०० (०७-०१-२०२२). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा (जि.जळगांव) येथील पंचायत कर्मचारी निवास स्थानाची अत्यंत दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच मागील वर्षभरात फक्त एकाच पंचायत कर्मचारी निवासस्थानाची डागडूजी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर डागडूजीचे काम त्वरीत पूर्ण करणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (२७-०५-२०२२) : (१) होय, हे खरे आहे,
(२) पंचायत समिती, पारोळा (जि.जळगांव) येथील कर्मचारी निवासस्थानांची एकूण संख्या ८ असून, ४ निवासस्थाने अत्यंत खराब असल्याने, सदरच्या निवासस्थानांचे निर्लेखन प्रस्तावित आहे. उर्वरीत ४ निवासस्थानांचे दुरुस्तीचे काम सन २०२०-२१ सालामध्ये पुर्ण करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

आजनसारा (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) येथील वर्धा नदीवरील बॅरेजबाबत

(५) ३५३३६ (०६-०१-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आजनसारा, येथील वर्धा नदीवरील बॅरेज प्रकल्प शासनाने अनेकवेळा जाहीर करुनही रखडला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेऊन व निधीची तरतूद करुन सदर प्रकल्पाच्या कामास तातडीने सुरुवात करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (११-०५-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
आजनसरा बॅरेज प्रकल्पास वनजमीन व पर्यावरण मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच पाणी उपलब्धतेबाबत शेरेपुर्ततेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. त्यामुळे प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आलेले नाही.
(२) प्रकल्पावर सन २०२२-२३ करिता रु.५ कोटींची तरतुद उपलब्ध आहे. वन विभाग व पर्यावरण विभागाची अंतिम मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पाचे काम सुरु करण्यात येईल.
(३) वनजमिनीची व पर्यावरण विभागाची अंतिम मान्यता मिळवण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

जोगेश्वरी (मुंबई) मधील रामवाडी येथे मद्यविक्रीचे दुकान बेकायदेशीररित्या सुरू करण्यात आले असल्याबाबत

(६) ३५५१८ (०५-०१-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील जोगेश्वरी-विक्रोळी जोड मार्गावरील रामवाडी येथील शासनाच्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत बांधण्यात आलेल्या जय भवानी या निवासी इमारतीत ॲक मे वाईन हे मद्यविक्रीचे दुकान बेकायदेशीररित्या सुरू करण्यात आले असल्याची बाब माहे, ऑगस्ट - सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नमूद जय भवानी या निवासी इमारत ही जोगेश्वरी गुंफेच्या प्रतिबंधित क्षेत्रात येत असल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून या इमारतीमधील नागरिकांना आवश्यक मूलभूत व नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नसताना व या निवासी इमारतीस अद्याप भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले नसताना या ठिकाणी अ‍ॅक मे वाईन हे मद्यविक्रीचे दुकान सुरू करण्यास परवानगी देण्यात आल्याने स्थानिक नागरिकांमध्ये शासनाप्रती असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू ठिकाणी बेकायदेशीररित्या सुरू करण्यात आलेल्या अ‍ॅक मे वाईन या मद्यविक्रीच्या दुकानावर तसेच या दुकानास बेकायदेशीररित्या परवानगी देणारे संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर तातडीने कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना निवेदन सादर केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने या संपूर्ण प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करून या प्रकरणी सदरहू मद्यविक्रीचे दुकान बंद करण्याबाबत व संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (३०-०५-२०२२) : (१) हे अंशतः खरे आहे. सदर प्रकरणी मा. विधानसभा सदस्य यांच्याकडून तक्रार प्राप्त झाली आहे.
(२), (३) व (४) सदर अनुज्ञप्तीबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने नियुक्त चौकशी अधिकारी तथा निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, “टि” विभाग, मुंबई उपनगर यांच्या दिनांक २४.०३.२०२१ रोजीच्या चौकशी अहवालानुसार, मे. अ‍ॅक्मे वाईन्स, एफएल-II क्र. २१४, सीएलएफएलटिओडी-III क्र.३२८ ही अनुज्ञप्ती जय भवानी बिल्डींग, जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड, मजासवाडी, जोगेश्वरी (पु.), मुंबई या ठिकाणी गेली १६ वर्षे सुरू असून नमूद अनुज्ञप्तीच्या जागेची खरेदी अनुज्ञप्तीधारकाची पत्नी यांनी त्यावेळी मे. जय भवानी बिल्डींगचे बिल्डर यांचेकडून नोंदणीकृत खरेदीखतान्वये केलेली आहे. सदर अनुज्ञप्ती त्याजागेवर स्थलांतरीत करण्यासाठी कार्यकारी अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडील आरंभ प्रमाणपत्र (Commencement Certificate) तसेच, त्यांनी मंजूर केलेला इमारतीचा नकाशा सादर केला आहे. जयभवानी को.ऑ.हौ.सोसायटीची सन १९८८ साली नोंदणी झाली असून सोसायटीची जागा ही संबंधीत विकासकाला झोपडपट्टी पुनर्वसनासाठी देण्यात आली होती. मात्र सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण न झाल्याने भोगवटा प्रमाणपत्र अप्राप्त असून सोसायटीच्या वतीने बिल्डर्स विरुद्ध झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे तक्रार दाखल केल्याचे नमूद करून प्रकरण अद्याप प्रलंबीत असल्याचे अहवालात नमूद केले आहे. प्रस्तुत प्रकरणी मा. विधानसभा सदस्य, जोगेश्वरी (पु.) जि. मुंबई उपनगर यांच्या दि. १४.१०.२०२१ च्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दि. १०.०२.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार, सदर अनुज्ञप्तीच्या जागेचे बांधकाम अधिकृत असल्याबाबत सक्षम प्राधिकरणाचा

पुरावा ३० दिवसात सादर करावा, अन्यथा महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ मधील कलम ५४(१) (इ) अन्वये सदर अनुज्ञप्तीचे व्यवहार मुंबई विदेशी मद्य नियमावली, १९५३ मधील तरतुदींनुसार सदर अनुज्ञप्ती इतरत्र स्थलांतरीत करेपर्यंत बंद करण्यात येत आहेत, असे संबंधीत अनुज्ञप्तीधारकास आदेशित करण्यात आले आहे. या आदेशानुसार सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पूरस्थितीच्या अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या "वडनेरे" समितीच्या अहवालाबाबत

(७) ३५७०५ (१२-०१-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१९ मध्ये भीमा व कृष्णा खोऱ्यात उद्भवलेल्या पूरपरिस्थितीचे विश्लेषण करण्यासाठी नेमलेल्या वडनेरे समितीचा अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला आहे काय,
(२) सांगली जिल्हयातील कृष्णा नदीच्या पूरपरिस्थितीची कारणे काय आहेत याबाबत "वडनेरे" समितीने सन २००७ मध्ये व दिनांक २८ मार्च,२०२० रोजी वा त्यासुमारास समितीने पुन्हा आपला अहवाल शासनास सादर केला होता हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त "वडनेरे" समितीने शासनास सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासन स्तरावर चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, सदरील अहवालात करण्यात आलेल्या शिफारशींवर कार्यवाही करण्यासाठी राज्य शासन विचाराधीन आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१२-०५-२०२२) : (१) होय हे खरे आहे.
(२) होय

सन २००५ व २००६ मध्ये उद्भवलेल्या पूर पूरपरिस्थितीचे अनुषंगाने श्री.वडनेरे निवृत्त प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या तांत्रिक समितीने (वडनेरे समिती) आपला अहवाल दि.२२ मे २००७ रोजी शासनास सादर केला आहे.

तसेच सन-२०१९ मध्ये उद्भवलेल्या पूरपरिस्थितीचे अनुषंगाने श्री.वडनेरे, निवृत्त प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या कृष्णा पूर अभ्यास समितीने कृष्णा उपखोऱ्याचा अभ्यास अहवाल दि.२७ मे, २०२० रोजी शासनास सादर केलेला आहे.
(३) शासन जलसंपदा विभागाने दि.०६.०४.२०११ रोजीच्या निर्णयान्वये तांत्रिक समितीने (वडनेरे समिती) सन-२००७ मध्ये सादर केलेल्या अहवालातील ४४ शिफारशींपैकी ३७ शिफारशी स्वीकृत केल्या असून ३ शिफारशी अंशत: बदलासह स्वीकृत केल्या आहेत व ४ अस्वीकृत केल्या आहेत.

तसेच शासन जलसंपदा विभागाने दि.१२.१०.२०२१ रोजीच्या निर्णयान्वये कृष्णा पूर अभ्यास समितीने (वडनेरे समिती) दि.२७ मे, २०२० रोजी सादर केलेल्या अहवालातील १८ शिफारशी पैकी १० स्वीकृत, ५ अंशत: स्वीकृत, १ सुधारणेसह स्वीकृत व २ अस्वीकृत केल्या आहेत.

(४) शासन स्तरावरून स्वीकृत व अंशत: स्वीकृत, तसेच सुधारणांसह स्वीकृत शिफारशींबाबत प्राप्त सुचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करणे शासनाच्या विचाराधीन आहे व सदर कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौ.शिरंगे (बोडण) (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदूर्ग) येथील तीस वर्षांपूर्वी धरण प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीची प्रकल्पग्रस्तांना नुकसान भरपाई अद्याप मिळाली नसल्याबाबत

(८) ३६००९ (०६-०१-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.शिरंगे (बोडण) (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदूर्ग) महाराष्ट्र-गोवा राज्याच्या संयुक्त प्रकल्पांतर्गत तिराळी धरण प्रकल्पासाठी येथील शेतकरी व ग्रामस्थांच्या जमिनी तीस वर्षांपूर्वी संपादित करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिराळी धरण प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात श्री.श्याम लक्ष्मण घाडी यांचेसह अनेक ग्रामस्थांच्या जमिनी गेल्या असल्याने या जमिनींची संयुक्त मोजणी करुन भरपाई/सानुग्रह अनुदान दिले जाईल, तथापि जमिनीधारकांनी जमीन भरपाईची वारंवार मागणी केल्यास नुकसान भरपाई न देता जमिनींमध्ये पाणी भरले जाईल" असे जलसंपदा तसेच महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रकल्पग्रस्तांना सांगण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी त्याबाबतचा निवाडा देऊन २ वर्षे उलटली तरी अद्याप श्री.श्याम घाडी व अन्य ग्रामस्थांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नसल्याचे माहे ऑक्टोंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नुकसान भरपाई अनुदान देण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरोधात श्री. श्याम घाडी व त्यांच्या आईने दिनांक ५ ऑक्टोंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास दोडामार्ग तहसिलदार कार्यालयासमोर बसून उपोषण सुरु केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (११-०४-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
तिलारी मोठा आंतरराज्य पाटबंधारे प्रकल्प, ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग हा महाराष्ट्र व गोवा राज्यांचा संयुक्त पाटबंधारे प्रकल्प असून मौजे शिरंगे, ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग या गावातील एकूण ४८४.९७ हे. जमीन तिलारी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रासाठी सुमारे ३० वर्षापूर्वी संपादित करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
तिलारी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात गेलेल्या एकूण ६ गावातील एकूण १५६६.२५ हे. क्षेत्राचे भूसंपादन पूर्ण झाले आहे. सदर भूसंपादनाची एकूण निवाडा रक्कम रु.१०.२५४५ कोटी रक्कमेचे वाटप करण्यात आले आहे.
(३) हे खरे आहे.
बुडीत क्षेत्रातील शिरंगे गावचे भूसंपादन प्रकरणी विशेष भूसंपादन अधिकारी यांचेकडून सुमारे ३० वर्षापूर्वी निवाडा जाहिर होऊन संबंधिताना मोबदला अदा करण्यात आलेला आहे. त्यामुळे विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी २ वर्षापूर्वी निवाडा दिला असल्याची बाब दिसून येत नाही.
सहाय्यक संचालक, नगररचना तथा अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि. १५/०२/२०१४ चे पत्रानुसार उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) जिल्हा मुख्यालय यांचे दि. १३/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये भूसंपादन नियम पुस्तिकेतील नियम क्र. २४३ नुसार सानुग्रह अनुदान देय होणार नसल्याचे श्री. लक्ष्मण बाबलो घाडी यांना कळविण्यात आले आहे.
श्री. लक्ष्मण बाबलो घाडी यांचा श्री. शाम लक्ष्मण घाडी हा मुलगा आहे.
(४) होय.
श्री.शाम लक्ष्मण घाडी हे दि.५/१०/२०२१ रोजी उपोषण करणार असलेबाबत अप्पर जिल्हादंडाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडून दि.२७/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. त्याअनुषंगाने श्री. शाम लक्ष्मण घाडी यांना अनुदान देय होणार नसल्याचे कार्यकारी अभियंता यांनी दि. ०१/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये पुन:श्च कळविणेत आले आहे.
तथापि नुकसान भरपाई/अनुदान देण्यास टाळाटाळ केली हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

खेराडे-विटा (ता.कडेगाव, जि.सांगली) येथील बंधारामधून होणाऱ्या पाणी गळतीमुळे शेतीचे नुकसान होत असल्याबाबत

(९) ३७६४६ (१०-०१-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेराडे-विटा (ता.कडेगाव, जि.सांगली) येथील गट क्रमांक ४४४ मधील बंधारा गत अनेक वर्षापासून मोडकळीस आला असून त्यातून पाणी गळती होत असल्याने आजूबाजूच्या परिसरातील शेतीचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक नागरीकांनी मा. जलसंधारण मंत्री यांना व जिल्हा परिषद कार्यालयात माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी निवेदनाच्या अनुषंगाने सदर बंधाऱ्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंकरराव गडाख (११-०५-२०२२) : (१) हे अंशतः खरे आहे.

सदर ठिकाणी जुना दगडी बंधारा असून त्याची मोठ्या प्रमाणात पडझड झालेली असल्याने त्यामध्ये पाणीसाठा होत नाही. तसेच सदर बंधाऱ्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील शेतीचे कोणतेही नुकसान झाल्याचे दिसून येत नाही.
(२) सदर बंधाऱ्याबाबत सरपंच, ग्रामपंचायत खेराडे विटा यांनी उपविभागीय जलसंधारण अधिकारी पंचायत समिती, विटा, जिल्हा परिषद उपविभाग (ल.पा.) यांना निवेदन दिलेले आहे.
(३) सदर बंधाऱ्याची मालकी जिल्हा परिषद (ल.पा.), जलसंपदा विभाग, कृषी विभाग व मृद व जलसंधारण विभाग या विभागांशी संबंधित नसल्याचे निष्पन्न होत आहे. त्यामुळे अधिकारी /कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

सदर बंधारा जुना व दगडी बंधारा असून त्याची मोठ्या प्रमाणात पडझड झालेली असल्यामुळे त्याठिकाणी दुरूस्ती ऐवजी नवीन सिमेंट बंधारा बांधकाम करणे संयुक्तीक आहे व त्यासाठी जिल्हा परिषद (ल.पा.) उपविभाग, विटा यांना आदेशीत केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

भंडारा (जि.भंडारा) येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात लागलेल्या आगीमुळे नवजात शिशू मृत्यूप्रकरणी जबाबदार असलेल्या संबंधित यंत्रणांवर कारवाई होणेबाबत

(१०) ३७६९४ (१३-०४-२०२२). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा (जि.भंडारा) येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील अतिदक्षता विभागातील नवजात शिशू केअर युनिटमध्ये दिनांक ९ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास मध्यरात्री लागलेल्या आगीत १० नवजात शिशूंचा मृत्यू झाला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भंडारा येथील प्रकरणात फक्त दोन परिचारिकांवरच दोष ठेवून त्यांची सेवा समाप्त करण्यात आली तथापि दोषी असलेल्या आरोग्य यंत्रणा, इन्क्युबेटर सप्लाय करणारी कंपनी तसेच फायर ऑडिट न करणारी एजन्सी या यंत्रणांवर कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणांत दोषी असलेल्या आरोग्य यंत्रणे मधील कर्मचारी, इन्क्युबेटरचा पुरवठा करणारी कंपनी तसेच फायर ऑडिट न करणाऱ्या एजन्सीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (२०-०४-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणात दोषी असलेल्या आरोग्य विभागातील डॉ. प्रमोद खंडाते, तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, भंडारा, डॉ (श्रीमती) सुनिता सुधाकर बढे, तत्कालीन अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक, डॉ. अर्चना मेश्राम, तत्कालीन वैद्यकिय अधिकारी व श्रीमती ज्योती भारस्करे, तत्कालीन परिसेविका, जिल्हा रुग्णालय भंडारा यांना निलंबित करण्यात आलेले आहे, तसेच फायर ऑडिट करण्यात आलेले आहे.
(३) जिल्हा रुग्णालय भंडारा यांचे फायर ऑडिट करण्यात आलेले असून रुग्णालयात अग्निशमन यंत्रणा बसविण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

धुळे जिल्हयाला जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मिळालेला निधी खर्च न झाल्याबाबत

(११) ३७९४३ (०७-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत धुळे जिल्ह्याला यंदा २१० कोटींचा निधी मिळाला असून त्यापैकी नऊ महिन्यांपर्यंत फक्त १४ कोटींचा निधी खर्च झाला असल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी उर्वरित निधी तातडीने वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच, किती कालावधीपर्यंत जिल्हा नियोजनाचा निधी खर्च करण्यात येणार आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (१२-०५-२०२२) : (१) होय.
(२) व (३) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२१-२२ अंतर्गत धुळे जिल्हयाच्या रुपये २१० कोटी निधी पैकी रुपये २०९.७७ कोटी निधी वितरीत करण्यात आला
असून सदर खर्चाची टक्केवारी ९९.९० इतकी आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही

शहाबाजपूर, (ता.जि.बीड) येथील एका उमेदवाराने आरोग्य विभागाच्या गट 'ड' संवर्गातील पदासाठी ३४ हॉलतिकिट प्राप्त झाल्याबाबत

(१२) ३७९८२ (२४-०४-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहाबाजपूर, (ता.जि.बीड) येथील एका उमेदवारांने आरोग्य विभागाच्या दि. २० ऑगस्ट, २०२१ रोजी घेण्यात येणाऱ्या गट "ड" संवर्गातील पदासाठी ऑनलाईन अर्ज केला असता त्याला तब्बल ३४ हॉलतिकिट प्राप्त झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०५-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

प्राप्त अहवालानुसार गट "ड" संवर्गाकरिता जिल्हानिहाय अर्ज करण्याची सुविधा उमेदवारांस उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यानुसार उमेदवारांने एकापेक्षा जास्त जिल्हयांकरिता अर्ज केल्यास जिल्हयांच्या संख्येनुसार उमेदवारास प्रवेशपत्र वितरित करण्यात आले होते.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कोकण वैधानिक विकास महामंडळ स्थापनेसाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याबाबत

(१३) ३८०७६ (०७-०४-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण वैधानिक विकास महामंडळाच्या स्थापनेसाठी महाराष्ट्र विधिमंडळाने केंद्र सरकारकडे पाठवलेल्या ठरावाचा राज्य सरकारकडून पुन्हा पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री, वित्त व नियोजन यांनी प्रश्न क्र. १३७२ च्या लेखी उत्तरात दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे काय, त्यानुषंगाने केंद्र शासनाकडून प्रतिसाद मिळाला आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाकडून अद्याप कोणताच प्रतिसाद मिळाला नसल्यास राज्य शासनाची भूमिका काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (२३-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) कोकण विकास मंडळ स्थापन करणेबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि.१७ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे विनंती केली आहे. तसेच दि. २७ सप्टेंबर, २०१८ व दि.०७ सप्टेंबर, २०१९ च्या पत्रान्वये कोकणासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याकरिता सत्वर निर्णय घेण्याची विनंती केंद्र शासनास केली आहे.

कोकणासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याकरिता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) (क) मध्ये दुरूस्ती करणे आवश्यक असून सदर बाब ही केंद्र शासनाच्या अधिकारकक्षेतील आहे.

अहमदनगर जिल्हात वार्षीक योजनेच्या आराखडयात मंजूर निधीपैकी फक्त ७० टक्के निधीचावापर न केल्याबाबत

(१४) ३८२०४ (०७-०४-२०२२). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हाच्या वार्षीक नियोजन आराखडयात ५१० कोटीची मंजूरी असून त्यापैकी फक्त ३० टक्के निधी अर्थात १५३ कोटी रुपये खर्च केला जाणार असून त्यातही १०० कोटी ७३ लाखांची कामे मंजूर केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी करोनाची विसरी लाट रोखण्यासाठी जिल्हयात करण्यात येणाऱ्या उपायोजनेत १४ प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण आरोग्य रुग्णालयात ५० खाटांची अतिरिक्त तरतूद, ऑक्सिजन साठवण्यासाठी १७५० जम्बो व ५० छोटे सिलींडर, तर जिल्हा रुग्णालयात केवळ ११ आय सी यू बेडची व्यवस्था करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहमदनगर जिल्हा वार्षीक योजनेच्या आरखडयात मंजूर निधीपैकी फक्त ७० टक्के निधीचा वापर न करण्यामागे काय कारणे आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्अनुषंगाने जिल्हा वार्षीक नियोजन आराखडयात मंजूर निधी न वापरणाऱ्या, निधीचे योग्य नियोजन न करणाऱ्या संबंधीत विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (१२-०५-२०२२) : (१) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२१-२२ अंतर्गत अहमदनगर जिल्हयाकरीता रुपये ५१० कोटी नियतव्यय मंजूर करण्यात आला होता. मार्च, २०२२ अखेर १०० टक्के निधी खर्च करण्यात आला आहे.

(२) जिल्हयातील १२ उपजिल्हा/ग्रामीण रुग्णालयात प्रत्येकी ५० खाटा क्षमतेचे Temporary Covid Centre उभारण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे तसेच ऑक्सीजन साठविण्यासाठी १७५० जंबो व ५० डयुरा सिलिंडर उपलब्ध करुन देण्यास मंजूरी देण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात एकूण ३८ बेडचे सर्व सुविधायुक्त २ अतिदक्षता विभाग कार्यान्वीत होते. परंतु दिनांक ०६/११/२०२१ रोजी आयसीयु क्रमांक १ ला आग लागून झालेल्या दुर्घटनेमुळे

तसेच पूर्ण जिल्हा रुग्णालयात अग्नीशमन यंत्रणा कार्यान्वीत करण्याचे काम प्रगतीत असल्याने सदर अतिदक्षता विभाग तात्पुरते बंद आहेत.

परंतु आपत्कालिन परिस्थितीत दाखल होणाऱ्या गंभीर रुग्णांवर उपचार करण्यासाठी जिल्हा रुग्णालयातील जुने अतिदक्षता विभागात ११ बेड तात्काळ कार्यान्वीत करण्यात आले आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

एटापल्ली (जिल्हा-गडचिरोली) तालुक्यातील आंगणवाडी सेविकेच्या विविध समस्यांबाबत

(१५) ३८२५४ (१२-०४-२०२२). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एटापल्ली (जि.गडचिरोली) या आदिवासी बहूल, अतिदुर्गम, नक्षलग्रस्त, जंगलाने व्याप्त असलेल्या तालुक्यातील बालकांना शाळापूर्व शिक्षण व पोषण आहार देण्याचे काम करणाऱ्या आंगणवाडी सेविकांना गेली ५ वर्ष निवृत्ती वेतन (पे न्शन) मिळालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यात कार्यरत असलेल्या आंगणवाडी सेविकांना गेल्या ३ वर्षाचे प्रवास भत्ता देयके (टी. ऐ. बील) मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंगणवाडी सेविकांना पोषण ट्रॅकर मध्ये इंग्रजी मधून माहिती भरण्यास सांगण्यात आले आहे तथापि त्या उच्चशिक्षीत नसल्यामुळे पोषण ट्रॅकरमध्ये इंग्रजीत माहीती भरणे त्यांना अवघड होत आहे अश्या प्रकारच्या तक्रारी लोकप्रतिनीधीदवारे शासनापर्यंत पोहोचविण्यात आलेल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२७-०४-२०२२) : (१) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती / मृत्यू / राजीनामा/ सेवेतून काढून टाकणे या प्रकरणी LIC मार्फत एकरकमी लाभ देण्याची योजना आहे. सदर योजनेतंर्गत एटापल्ली (जि.गडचिरोली) या तालुक्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या एकरकमी लाभ देण्याबाबतच्या एकूण ७२ प्रकरणापैकी २२ प्रकरणी एकरकमी योजनेचा लाभ देण्यात आला असून उर्वरीत ५० प्रकरणी एकरकमी योजनेचा लाभ मंजूर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

अंगणवाडी सेविका यांचे सन २०१८-१९ व २०१९-२० या कालावधीतील संपूर्ण प्रवास भत्याची रक्कम अदा करण्यात आलेली असून सन २०२०-२१ या कालावधीतील निधीचा अनुपल्बधतेमुळे प्रवास भत्ता अदा करण्यात आला नाही परंतू सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात याकरिता निधी वितरित करण्यात आला आहे.

(३), (४) व (५) पोषण ट्रॅकर हे ॲप्लीकेशन केंद्र शासनाचे असून ते मराठी भाषेमध्ये उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा आणि जलसंपदा विभागाचा वित्त विभागाकडे पाठविण्यात आलेल्या अहवालाबाबत

(१६) ३८८०५ (०५-०४-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या विविध विभागांच्या आढावा घेऊन पदाबाबतचा आकृतीबंदाचा अहवाल दहा वर्षानी वित्त विभागाकडे पाठविला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा आणि जलसंपदा विभागाचा अहवाल वित्त विभागाकडे पाठविण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालाचे स्वरुप काय आहे, त्यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१७-०५-२०२२) : (१) वित्त विभाग परिपत्रक दि.२९/०६/२०१७ अन्वये सर्व प्रशासकीय विभागांना सुधारित आकृतीबंध निश्चित करण्याबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. तसेच विभागाचे कामाचे स्वरुप व व्याप्ती यामध्ये झालेला बदलानुसार आकृतीबंधाचा फेर आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(२), (३) व (४) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या एकूण ३६८८ पदांचा आकृतीबंध सप्टेंबर, २०२१ मध्ये वित्त विभागाकडे सादर करण्यात आला असून अद्याप वित्त विभागाकडून सचिवस्तरीय उपसमितीची मान्यता प्राप्त झालेली नाही. जलसंपदा विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयांतील कार्यप्रकारनिहाय कामाचे स्वरुप, व्याप्ती, पदे व रिक्त पदे यांचा फेरआढावा घेऊन प्रस्ताव वित्त विभागास दि. ०५/१२/२०१९ व दि. ०१/१२/२०२१ रोजी सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषगांने वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केले आहेत. वित्त विभागाच्या मुद्यांची पूर्तता करणारा सुधारित प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरामधील नियोजन भवनाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊनही इमारत विना वापर पडून असल्याबाबत

(१७) ३९१५४ (११-०४-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरामधील नियोजन भवनाच्या इमारतीचे बांधकाम मागील तीन वर्षाआधी पूर्ण करण्यात आले असूनही इमारत विना वापर पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारती मध्ये अद्याप नियोजन विभागाचे कामकाज सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने काय आढळून आले तसेच नियोजन विभागाचे कामकाज सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करण्याची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (१२-०५-२०२२) : (१), (२) व (३) नागपूर शहरातील नियोजन भवनाच्या इमारतीचे काम प्रगतीपथावर असून या इमारतीच्या उर्वरित अतिरिक्त कामाच्या रुपये ७४३.६२ लक्षच्या स्वतंत्र अंदाजपत्रकास भाग-२ म्हणून नव्याने मंजूरी देण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता. नियोजन विभागाच्या दिनांक २२/०२/२०२२ च्या शासन परिपत्रकातील तरतूदीनुसार जिल्हाधिकारी हे जिल्हा नियोजन भवन, नागपूर (भाग-२) च्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यास सक्षम असल्याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर यांना दिनांक १९/०४/२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

आरोग्य विभाग कर्मचारी भरती प्रक्रियेतील झालेला गैरव्यवहार

(१८) ३९४१० (२४-०४-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरोग्य विभाग कर्मचारी भरती प्रक्रियेतील प्रश्नपत्रिका फुट प्रकरणात सायबर गुन्हे शाखेने दोन दलालांना अटक केलेली असून सदर गैरप्रकारामध्ये परीक्षा घेणाऱ्या न्यासा या कंपनीच्या संचालकांची चौकशी करण्यात येणार असल्याची बाब दिनांक २९ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अटक करण्यात आलेल्या दलाल निषिद गायकवाड, राहुल लिंघोट यांनी परीक्षार्थीकडून प्रत्येकी आठ लाख रुपये घेतल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विषयी शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१७-०५-२०२२) : (१) प्राप्त अहवालनुसार होय, हे खरे आहे.
सायबर पोलीस स्टेशन पुणे शहर गुन्हा रजिस्टर क्र. ५३/२०२१ व ६०/२०२१ अद्यापपर्यंत एकूण ११ आरोपी अटक करण्यात आले आहेत. सदर गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने पोलीसांकडून न्यासा कंपनीचे संचालक व अधिकारी यांच्याकडे गुन्हयाचे अनुषंगाने आवश्यकती माहिती /कागदपत्रे मागविण्यात आली असून त्या अनुषंगाने त्यांच्याकडे चौकशी करण्यात येत आहे.

(२) प्राप्त अहवालानुसार हे अंशत: खरे आहे.
सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर यांनी दिलेल्या माहितीनुसार अटक आरोपी, दलाल निशीद गायकवाड, राहुल लिंगोट यांचेकडे केलेल्या तपासात त्यांनी परिक्षार्थींकडून प्रत्येकी ८ लाख रूपये घेतले असल्याचे निश्चित केले असून त्यापैकी प्रत्येकी २ लाख रूपये अद्याप पर्यंत स्विकारले असल्याचे कबूल केले आहे. सदर प्रकरणी अधिक तपास चालू आहे.
(३) प्राप्त अहवालानुसार सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर यांनी दिलेल्या माहितीनुसार सदर प्रकरणी आरोपी विरोधीत सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर गुन्हा रजिस्टर क्र. ५३/२०२१ व ६०/२०२१ भा.दं. वि कलम ४०६, ४०९, ४२०, १२० (ब), ३४ सह महाराष्ट्र विद्यापीठ, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परिक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम (१९९० सुधारित) कलम ३,५,६,८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून मार्च अखेरपर्यंत ११ आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यापैकी ०५ आरोपी आरोग्य सेवा आयुक्तालयाशी संबंधीत या ०५ अधिकारी/कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची परवानगी विभागाकडून देण्यात आली आहे. तसेच त्यांना निलंबीत करून विभागीय सुरू चौकशी करण्यात आली आहे. तसेच अद्याप पोलीस तपास प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

आरोग्य विभागाने घेतलेली औषधे प्राथमिक आरोग्य केंद्रांना व उपकेंद्रासाठी वेळेत वाटप न झाल्यामुळे झालेले नुकसान

(१९) ३९४२५ (२४-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरोग्य विभागाने जिल्हा नियोजन व विकास (DPDC) योजनेंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रांना व उपकेंद्रासाठी औषध पुरवठा करणेसाठी सन २०१७-१८ मध्ये रुपये ५५,२३,५५१ इतका खर्च केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात साहित्य वाटप करणे हे गरजेचे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हयाची गरज व राज्य स्तरावरुन प्राप्त होणारा पुरवठा याचा मेळ घेवून खरेदी केलेली नसल्याने औषधे दि. ३१ मार्च, २०१८ अखेर पर्यत वाटपाविना शिल्लक राहिली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणची शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार या प्रकरणात दोषी आढळलेल्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१३-०५-२०२२) : (१) सदर बाब जिल्हा परिषद, आरोग्य विभाग, जळगाव बाबत आहे.

(२) नाही.

शासन निर्णय ०६.०६.२००८ अन्वये जिल्हा परिषदांना चालू वित्तीय वर्षात प्राप्त निधी लगतच्या वर्षात खर्च करण्यास परवानगी आहे. तसेच एखाद्या वित्तीय वर्षात खरेदी करण्यास आलेले औषधे मुदतबाह्य होण्यापूर्वी वाटप करणे गरजेचे आहे.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

अपघातग्रस्त व आपदग्रस्त गरजू रुग्णांसाठी १०८ रुग्णवाहिका डॉक्टरांच्या सुविधेसह वेळेवर उपलब्ध होणेबाबत

(२०) ३९७१८ (१३-०४-२०२२). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव-पाथर्डी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अपघातग्रस्त व आपदग्रस्त गरजू रुग्णांसाठी सुरु करण्यात आलेली १०८ रुग्णवाहीका अहमदनगर जिल्हयात विशेषत: शहरालगत वेळेत उपलब्ध होत नाहीत किंवा उपलब्धच होत नाहीत अशा तक्रारी व बातम्या येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुरध्वनी केल्यानंतर रुग्णवाहिका वेळेवर पोहोचत नाही किंवा उपलब्धच होत नाही किंवा वरिष्ठांच्या खाजगी कामाला गेल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपघातग्रस्त व आपदग्रस्त गरजू रुग्णांसाठी १०८ रुग्णवाहीका डॉक्टरांच्या सुविधेसह वेळेवर उपलब्ध व्हावी यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. राजेश टोपे (२०-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.

अशी कोणतीही तक्रार व बातमी प्राप्त झालेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील अंगणवाडी इमारतीची झालेली दुरवस्था

(२१) ३९७३२ (१२-०४-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.खर्डी (ता.शहापूर,जि.ठाणे) येथे केंद्र शासनाच्या केरळ पॅटर्न योजनेतून लाखो रुपये खर्च करुन अंगणवाडी इमारत बांधून पूर्ण करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणच्या अंगणवाडीचा एक दिवसही वापर न केल्यामुळे भिंती व स्लॅब खिळखिळीत होऊन एक भाग कोसळला असून सदरहू अंगणवाडीची दुरावस्था झाली असून त्याठिकाणी अनेक गैरप्रकार सुरु असल्याचे दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अंगणवाडीची इमारत पडीक झाली असून जिल्हापरिषदेने परवानगी दिल्यानंतर इमारत पाडण्यात येईल त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरु असून खर्डी ग्रामपंचायतीस आर्थिक उत्पन्न मिळेल याचा विचार करुन नवीन इमारत बांधण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील असे प्रशासक, खर्डी ग्रामपंचायत यांच्याकडून सांगण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी लाखो रुपये खर्च करुनही अंगणवाडी इमारतीचा वापर न करण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यामध्ये काय आढळून आले,

(५) असल्यास, तद्अनुषंगाने उक्त अंगणवाडीची नवीन इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२७-०४-२०२२) : (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

पालघर जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समितीच्या कामांचा तपशील दर्शविणारा फलक लावत नसल्याबाबत

(२२) ३९७४३ (१२-०४-२०२२). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील विविध ठिकाणी सुरु असलेल्या विकास कामांच्या विशेषत: जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून सुरु असलेल्या कामांच्या ठिकाणी कामाचे तपशील दर्शविणारा फलक लावण्याचे आदेश मा.जिल्हाधिकारी यांनी दिलेले असतानाही आदेशाकडे दुर्लक्ष करुन फलक लावण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी आदेशांची पायमल्ली होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त आदेशांची पायमल्ली करणाऱ्याविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (१२-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.

जिल्हा नियोजन समितच्या निधीमधून कामे प्रस्तावित करताना अंदाजपत्रकामध्ये कामाचा तपशिल दर्शविणाऱ्या फलकाचा समावेश करण्यात येतो. कामाचे देयक अदा करताना माहिती फलक बसविण्याचा फोटो देयकासोबत जोडण्यात येतो तसेच जागेवर फलक बसविल्याबाबत तपासणी केल्याची नोंद उपअभियंता यांच्याकडून मोजमाप पुस्तकात करण्यात येते.

(२), (३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

सांगली जिल्हयातील परिचारिकांची रिक्त पदे भरणेबाबत

(२३) ३९८५३ (१३-०४-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, शहरी आरोग्य केंद्र, सिव्हील हॉस्पिटलमध्ये अनेक वर्षापासून परिचारिकांची पदे रिक्त असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१७-०५-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) प्राप्त अहवालानुसार सांगली जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, शहरी आरोग्य केंद्र, जिल्हा सामान्य रुग्णालयात कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती, स्वेच्छासेवानिवृत्ती, मयत, पदोन्नती तसेच नविन निर्माण झालेल्या आरोग्य संस्थेकरिता नवीन मनुष्यबळ निर्मिती झाल्याने रिक्त पदांची संख्या अधिक असल्याचे दिसून येत आहे.

(३) प्राप्त अहवालानुसार जिल्हा परिषद, सांगली येथील आरोग्य सेविकांची रिक्त पदे भरणेबाबत ग्रामविकास विभागाकडून दि.२५.०२.२०२१ व दि.२६.०८.२०२१ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सरळसेवा परीक्षा अद्याप न झाल्याने माहे डिसेंबर २०२१ अखरे बिंदुनामावली नोंदवहीची पडताळणी करून रिक्त पदे निश्चित करण्याची बिंदुनामावली नोंदवही पडताळणी करणेची कार्यवाही सुरू आहे. तसेच, बदली पदोन्नतीने रिक्त पदांवर पदस्थापना देण्यात येत आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालय सांगली येथील गट क परिचारीकांची पदे भरणेबाबत माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली असून सदर पदाची परिक्षा दि.२४.१०.२०२१ रोजी घेण्यात आली होती. पेपर फुटीच्या तक्रारींच्या अनुषंगाने विभागाकडून गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पुढील पोलीस तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत सामाजिक सभागृहासाठी पत्र्याचे छत सिमेंटचे (आर.सी.सी) घालण्याबाबत

(२४) ३९८९२ (०१-०४-२०२२). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमदार स्थानिक विकास कार्यक्रमातंर्गत सामाजिक सभागृहासाठी सिमेंट (आर.सी.सी) पत्र्याचे छत बसविण्याबाबत दिनांक ५ जानेवारी, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शासन निर्णयातील अट रदद करण्याबाबतची मागणी सर्वपक्षीय लोप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शासन निर्णयातील अट रदद करुन पूर्वीप्रमाणे पत्र्याची छत बसविण्याची परवागनी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (१८-०५-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत नियोजन विभागाच्या दि. १२.७.२०१६ च्या शासन निर्णयान्वये सभागृहास पक्के छत बंधनकारक करण्यात आले आहे.

(२) व (३) कोकण विभागातील लोकप्रतिनिधींनी सदर अट शिथिल करुन पत्र्याचे छत घालण्यास मान्यता देण्याबाबतची मागणी केली होती. त्या अनुषंगाने नियोजन विभागाच्या शासन पत्र क्र. संकीर्ण-१२२१/प्र.क्र.११७/का.१४८२, दिनांक २९ मार्च, २०२२ अन्वये कोकण विभागातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करता आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सामाजिक सभागृहासाठी पक्के छत असावे, ही अट शिथिल करुन कोकण विभागातील जिल्हयांमध्ये बांधण्यात येणाऱ्या सामाजिक सभागृहांवर मानकानुसार उतार देऊन पारंपारिक / आधुनिक पध्दतीच्या पत्र्याचे छत घालण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

अमरावती जिल्हयात देशी विदेशी मद्‌याविक्रीच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याबाबत

(२५) ३९९५८ (१२-०४-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नियमानुसार दुकानातून मद्‌य खरेदी करताना देशी साठी दोन रुपयांचा विदेशी मद्‌यासाठी ५ रुपयांचा मद्‌य सेवन परवाना आवश्यक असताना शहर व ग्रामीण अशा दोन्ही भागात मद्‌य विक्रेत्यांकडून नियमावलीचे उल्लंघन होत असल्याचे अमरावती जिल्हयात व आसपासच्या परिसरात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी मद्‌य सेवन करण्यासाठी परवाना आवश्यक आहे तशी राज्य उत्पादन शुल्क विभागाची नियमावली आहे ग्राहकांकडे परवाना नसेल तर मद्‌यविक्री करणे नियमबाहय आहे असे असतानाही अमरावती जिल्हयात हे नियमबाहय विक्री केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (१९-०५-२०२२) : (१), (२) व ३) हे अंशतः खरे आहे.

अमरावती जिल्ह्यात सन २०२१-२०२२ मध्ये दि.४.१.२०२२, दि.११.३.२०२२ व दि.१२.३.२०२२ रोजी सीएल-३ अनुज्ञप्तीविरुध्द मद्य सेवन परवाना नसताना मद्य विक्री केल्याबाबत व इतर त्रुटींबाबत तीन नियम उल्लंघन प्रकरणे नोंदविण्यात आली असून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली आहे. सदर प्रकरणात सीएल-३ अनुज्ञप्तीधारकांकडून प्रत्येकी रु.५०,०००/- असे एकूण रु.१,५०,०००/- इतके तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

भामा आसखेड धरणाची हद्द निश्चिती नसलेबाबत

(२६) ४०१५१ (०५-०४-२०२२). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामा-आसखेड धरणात भराव करून मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केल्याचे माहे जानेवारी महिन्यात निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिक्रमणामुळे धरणातील पाणी साठवण क्षमता कमी होत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ही गंभीर स्वरूपाची बाब समोर येऊन सुद्धा प्रशासनातील कोणताही विभाग गंभीर होऊन कारवाई करत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यामध्ये अतिक्रमण करणाऱ्या अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२६-०५-२०२२) : (१) होय.

(२) हे खरे नाही.

धरणातील साठवण क्षमतेवर कोणताही परिणाम होत नाही.

(३) हे खरे नाही.

भामा आसखेड धरण विभागाने अतिक्रमण निश्चित करण्यासाठी संबंधीतांना दि.०५/१२/२०१९ च्या पत्रान्वये नोटीस बजावण्यात आली आहे. त्यानुसार अतिक्रमण करुन बांधण्यात आलेले सर्व शेड संबंधीतांकडून काढण्यात आली आहेत. तसेच अतिक्रमण केलेल्या जागेतील काही प्रमाणात माती भराव काढण्यात आला आहे. त्यानंतर उर्वरित अतिक्रमण काढणेसाठी संबंधीतांना दिनांक २७ ऑक्टोबर, २०२१ व दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२२ च्या पत्रान्वये नोटीस देण्यात आली आहे. तसेच दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ रोजी पोलीस स्टेशन, चाकण येथे योग्य

त्या कलमाखाली गुन्हा नोंदविण्यासाठी पत्रव्यवहार केला आहे. संबंधीतांनी पाणी कमी झाल्यावर अतिक्रमण काढून टाकण्याचे दिनांक २१ मार्च, २०२२ च्या पत्रान्वये आश्वासन दिले आहे. त्यानुसार भामा आसखेड धरण विभागामार्फत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात सुपर मार्केटमध्ये वाईन विक्री करण्याच्या परवानगीचा निर्णय मागे घेण्याबाबत

(२७) ४०२८७ (१२-०४-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.राहूल आहेर (चांदवड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सुपर मार्केटमध्ये वाईन विक्री करण्याच्या परवानगीचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार वाईन विक्रीला खुली परवानगी दिली आहे त्याच धर्तीवर मोहाच्या फुलाच्या वाईन विक्रीला परवानगी दिल्यास ग्रामीण भागातील आदिवासी कातकरी बांधवाचा आर्थिक स्तर उच्चावण्यास मदत होईल. अशी मागणी लोक प्रतिनिधीसह राज्यातील विविध स्तरातून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दारू स्वस्त करून नवीन दारू विक्री परवाने देण्याचा निर्णय तसेच थेट सुपर मार्केट व किराणा दुकानात खुलेआम मद्य विक्री सुरू केल्यामुळे तरूण पिढीच्या आरोग्यास धोका निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मॉल आणि किराणा दुकानात मद्य विक्रीमुळे सार्वजनिक ठिकाणी सुरक्षेसंबंधीचाही धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्‌अनुषंगाने खुलेआम मद्य विक्री करण्याचा निर्णय मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (१९-०५-२०२२) : (१) राज्य मंत्रिमंडळाच्या दि. २७.१.२०२२ च्या बैठकीत सुपर मार्केट किंवा वॉक-इन-स्टोअरमध्ये कुलूपबंद करता येईल अशा कपाटामधून (Shelf in Shop), मद्यसेवन परवानाधारकास सीलबंद बाटल्यामध्ये केवळ वाईनची विक्री करण्यास परवानगी देण्यासाठी नियमात सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(२) अंशतः खरे आहे.
अशी मागणी मा.श्री किसन कथोरे, विधानसभा सदस्य यांनी दि.३१.१.२०२२ च्या पत्रान्वये केली आहे.

(३), (४) व (५) सदर निर्णयाच्या अनुषंगाने विशेष परवाने आणि अनुज्ञप्ती नियम, १९५२ मध्ये सुधारणा करण्यासाठी प्रारुप नियम नागरिकांच्या हरकती/ सूचनांकरिता शासन अधिसूचना, दि.३१.३.२०२२ अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहेत. यासाठी ९० दिवसांचा कालावधी देण्यात आला असून नागरिकांकडून दि.२९ जून, २०२२ पर्यंत प्राप्त होणा-या हरकती / सूचना विचारात घेऊन शासनाकडून या प्रकरणी पुढील यथायोग्य निर्णय घेण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

साखळी (ता. जि. बुलडाणा) येथील आरोग्य उपकेंद्रास दर्जावाढ करून प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करणेबाबत

(२८) ४०४३० (२४-०४-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखळी (ता. जि. बुलडाणा) येथे आरोग्य उपकेंद्र असून ते व आसपास असणारे इतर गाव ही वरवंड (ता.जि.बुलडाणा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रा अंतर्गत असल्याने भौगोलिकदृष्ट्या साखळी, येळगाव, सव, अंत्री तेली, रूईखेड टेकाळे या व इतर गावांसाठी ते गैरसोयीचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साखळी हे गाव खूप मोठे असून त्या ठिकाणी उपकेंद्र असल्याने आरोग्य सुविधा अपुऱ्या पडत असल्याने तेथील आरोग्य उपकेंद्रास दर्जावाढ देऊन प्राथमिक आरोग्य केंद्रास मान्यता देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.१ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा आणि दिनांक ५ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा.आरोग्य मंत्री यांच्याकडे लेखी स्वरूपात केल्यानंतर उपसंचालक, आरोग्य विभाग, अकोला यांनी प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना जिल्हा आरोग्य अधिकारी, बुलढाणा यांना केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०५-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर विषयाबाबतचे मा. लोकप्रतिनिधी यांचे दि. ३१ मार्च, २०२१ रोजीचे पत्र दि. ०४/०९/२०२१ रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांना प्राप्त झाले आहे.

(३) मौजे साखळी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव शासनाला सादर करणेसाठी आवश्यक आरोग्य समिती जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा व जिल्हा नियोजन समितीचे ठरावास मान्यता घेण्याबाबत जिल्हा परिषद स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उंद्री (ता.चिखली, जि.बुलडाणा) येथे ग्रामीण रुग्णालय होण्याबाबत

(२९) ४०४३७ (२४-०४-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंद्री (ता.चिखली, जि.बुलढाणा) या गावास लागून ५० पेक्षा जास्त खेडेगाव असून येथील बाजारपेठ मोठी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उंद्री येथे प्राथमिक आरोग्य केंद्र असून त्याठिकाणच्या आरोग्य सुविधा तेथील लोकसंख्येच्या मानाने अपुरे पडत असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्राची दर्जावाढ करून ग्रामीण रुग्णालयास मान्यता देण्यात यावी अशी मागणी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा शल्यचिकित्सक, बुलढाणा यांच्याकडे केल्यानंतर त्यासदंर्भातला प्रस्ताव तयार झालेला असून त्याठिकाणच्या ग्रामीण रुग्णालयासाठी तोरणवाडा ग्रामपंचायत अंतर्गत ई क्लास जमीन सुद्धा उपलब्ध करून देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उंद्री येथील ग्रामीण रुग्णालयास तातडीने मान्यता देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांच्याकडे व दिनांक ६ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा तयासुमारास मा.आरोग्य मंत्री तसेच दिनांक १० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.अन्न व औषध प्रशासन तथा पालकमंत्री, बुलडाणा जिल्हा यांच्याकडे लेखी स्वरूपात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, सन २०११ च्या लोकसंख्येवर जोड बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही आरोग्य सेवा संचालनालयस्तरावरुन सुरु असून मौजे उंद्री येथे ग्रामीण रुग्णालय मंजुर करण्याबाबतच्या मागणीचा निकषानुसार जोड बृहत आराखडयामध्ये समावेश करण्याची सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०५-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) सन २०११ जनगणनेवर आधारीत नवीन आरोग्य संस्था स्थापना व श्रेणीवर्धन करण्यासाठी आरोग्य संस्थांचा जोड-बृहत आराखडा तयार करण्यात येत असून त्यानुसार सदर संस्था निकषात बसत असल्यास जोड- बृहत आराखड्यामध्ये प्रस्तावित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात नागरिकांना दिलासा देण्यासाठी पेट्रोल व डिझेलचा भाव कमी करण्यासाठी आकारण्यात येणारा व्हॅट कमी करण्याबाबत व दुष्काळी सेस रद्द करण्याबाबत

(३०) ४०८३४ (१२-०४-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने पेट्रोलवरील ५ रूपये व डिझेलवरील १० रूपये व्हॅट कमी करून नागरिकांना दिलासा दिला त्याच धर्तीवर राज्य शासनाने राज्यात पेट्रोल व डिजेलवर व्हॅट कमी न केल्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजीची भावना निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात डिझेलवर ४० टक्के व पेट्रोलवर २५ टक्के व्हॅट पेट्रोलवर प्रती लिटर ९ रूपये दुष्काळी सेसही आकारला जात असल्यामुळे शासनाला पेट्रोल व डिझेल वरील करापोटी ३० ते ४० प्रती लिटर उत्पन्न मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डिझेल व पेट्रोलवर आकारण्यात येणाऱ्या करामध्ये राज्यात दुष्काळी परिस्थिती नसताना देखील ३ रूपये दुष्काळी सेस आकारला जात आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यात नागरिकांनी दिलासा देण्यासाठी पेट्रोल व डिझेलचा भाव कमी करुन आकारण्यात येणारा व्हॅट कमी करण्याबाबत व दुष्काळी सेस रद्द करण्याबाबत कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (२३-०५-२०२२) : (१) १) केंद्र शासनाने दिनांक ०६-०५-२०२० मध्ये पेट्रोल व डिझेल वरील सेस तसेच विशेष अतिरिक्त अबकारी कर (SED) मध्ये पेट्रोल व डिझेल वर अनुक्रमे १० व १३ रुपये अशी वाढ केली होती. नोहेंबर २०२१ मध्ये केंद्र शासनाने पेट्रोल व डिझेल मध्ये केलेली कपात अनुक्रमे ५ व १० रुपये हो कोरोना कालावधीत वाढविलेल्या दरांच्या अनुषंगाने केल्याचे दिसते.

(२) कोविड १९ या साथरोगामुळे व त्याअनुषंगाने लागू केलेल्या लॉकडाउनमुळे पेट्रोल व डिझेलच्या वापरात झालेल्या घटीमुळे शासनाची झालेली महसुल तुट भरुन काढण्याकरीता १ जून २०२० मध्ये मुल्यवर्धित कराच्या दरात प्रति लिटर २ रुपयांची वाढ करण्यात आली. त्यानंतर पेट्रोल व डिझेल च्या मुल्यवर्धित करात कोणतीही वाढ केलेली नाही.

(२) पेट्रोल व डिझेलवर मूल्यवर्धित कर कायद्यांतर्गत कुठलाही सेस आकारला जात नाही. पेट्रोल व डिझेलवर प्रति लिटर आकारण्यात येणारा अनुक्रमे रु. १०.१२ व रु. ३.०० हा सेस नसून अतिरिक्त मूल्यवर्धित कर आहे. तसेच पेट्रोल व डिझेलवर राज्य शासनाला प्रति लिटर अनुक्रमे रु. ३०.०० ते ३१.०७ व रु. १८.५० त २०.९७ इतके उत्पन्न मूल्यवर्धित करापोटी मिळते.

(३) डिझेल व पेट्रोलवर आकारण्यात येणाऱ्या करामध्ये राज्यात दुष्काळी परिस्थिती नसताना देखील ३ रूपये दुष्काळी सेस आकारला जात आहे, हे खरे नाही.

(४) ४ नोव्हेंबर, २०२१ पासून केंद्र शासनाने पेट्रोल व डिझेलवरील सेस अनुक्रमे प्रतिलिटर रु.५/- व रु.१०/- याप्रमाणे कमी केलेले आहे. त्यामुळे पेट्रोल डिझेलच्या बाबतीत राज्याला मुल्यवर्धित करापासून मिळणाऱ्या महसूलात अनुक्रमे प्रतिलिटर रु.१.१९ व रु.२.४१ इतकी घट झाली आहे. परिणामी दरमहा अंदाजित रु.२४७ कोटी एवढी महसूलात घट होत आहे. (पेट्रोलच्या बाबतीत प्रतिमाह रु.४५ कोटी व डिझेलच्या बाबतीत प्रतिमाह रु.२०२ कोटी).
राज्य शासनाची वस्तु व सेवा कराची नुकसान भरपाई एकूण २६,४७७/- कोटी रुपये (दि. १९.०४.२०२२ रोजीची स्थिती) केंद्राकडे प्रलंबित आहे. तसेच सन २०२२-२३ नंतर Compensation Cess च्या माध्यमातून राज्य सरकारांना केंद्राकडून मिळणारी नुकसान भरपाई मिळणे बंद होणे अपेक्षित असून त्यामुळे सन २०२२-२३ पासून राज्याच्या महसूलावर आणखी मोठ्या प्रमाणावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.
या पार्श्वभुमीवर राज्याच्या एकंदरीत आर्थिक स्थितीचा विचार करुनच पेट्रोल व डिझेल वरील मुल्यवर्धित कराच्या दरात कपात करणे संयुक्तिक ठरणार नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम जिल्ह्यातील विकासासाठी १८५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून ६४.७१ कोटी रुपयांचा निधी शिल्लक असल्याबाबत

(३१) ४११२४ (०१-०४-२०२२). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील विकासासाठी नियोजन समितीकडून जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून १८५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीमधून १३१.४३ कोटी रुपयांच्या विविध कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून उर्वरित ६४.७१ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदर ६४.७१ कोटी रुपयांचा निधी कोणकोणत्या विभागाला देण्यात आले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (२५-०४-२०२२) : (१) होय.
(२), (३) व (४) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२१-२२ करीता मंजूर निधीतून आर्थिक वर्ष अखेर (दि.३१/०३/२०२२ अखेर) रुपये २२४.१२ कोटी रुपयांच्या प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत. वाशिम जिल्हयास मंजूर करण्यात आलेल्या रुपये १८५ कोटी निधीपैकी सर्व (१०० टक्के) निधी कार्यान्वयीन यंत्रणांना वितरीत करण्यात आला असून कोणताही निधी शिल्लक नाही.

औरंगाबाद जिल्हयातील धरणा संबंधीची कार्यालये औरंगाबाद येथे आणण्याबाबत

(३२) ४१२१३ (०१-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील मधमेश्वरसह भाम, भावली, मुकणे, वाकी या धरणांचे नियंत्रण नाशिकमधून केले जात असल्याने हे कार्यालय वैजापूर, औरंगाबादच्या नियंत्रणाखाली आणावे तसेच कोकणातून सुरु होणाऱ्या नदी जोड प्रकल्पाचेही कार्यालय नाशिकवरुन औरंगाबादला आणावे, राष्ट्रीय विकास जलअधिकारण केंद्राचे कार्यालय अशी काही कार्यालये मराठवाडयाच्या विकासासाठी औरंगाबादमध्ये सुरु करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१७-०५-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) भाम, भावली, वाकी व मुकणे या चारही धरणांचे लाभक्षेत्र नाशिक जिल्हयामध्ये देखील आहे. वैजापूर, औरंगाबाद या उपविभागीय कार्यालयाचे प्रत्यक्ष अंतर चारही धरणांपासून अधिक असल्याने आपत्कालीन प्रसंगी तातडीने परिस्थिती हाताळणे जोखमीचे होऊ शकते. यास्तव भाम, भावली, वाकी व मुकणे या धरणांचे नियंत्रण असणारे उपविभागीय कार्यालय, वैजापूर जिल्हा औरंगाबाद येथे स्थलांतरीत करणे संयुक्तिक होणार नाही असा निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रीय विकास जल अधिकारण केंद्र हे केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली असल्याने याबाबत राज्य शासनाच्या स्तरावर निर्णय घेण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्यात आण्यात येणाऱ्या योजनेबाबत

(३३) ४१३०३ (११-०४-२०२२). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्यात आण्यात येणाऱ्या योजनेला चालणा देण्यासाठी कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली, परंतू शासन निर्णय २९/६/२०२० अन्वये समितीची पुनर्रचना करण्यात येऊन ठाणे कार्यकारी संचालक कोकण पाटबंधारे विकास महासंडळ ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दमणगंगा वैतरणा-गोदावरी या नदीजोड योजनेंतर्गत ५ धरणे बांधण्याचे प्रस्तावित असून सदर धरणे एकमेकांशी बोगद्याद्वारे/कालव्याद्वारे जोडण्यात येऊन ७.१३

अघफू पाणी उपसा पद्धतीने उचलून गोदावरी खोर्यातील देवनदीत वळविण्याचे प्रस्तावित आहे तसेच दमणगंगा एकदरे गोदावरी योजनेतंर्गत एकदरे येथे धरण बांधून उपसा पद्धतीने ५.०४ अघफू पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्यात येणार आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, उपरोक्त नदीजोड योजनांचे सविस्तर अहवाल राष्ट्रीय जलविकास प्राधिकरण नवी दिल्ली या केंद्र शासन अंगीकृत अभिकरणाद्वारे तयार करण्यात येवून सदरील प्रकल्पाचे अहवाल जून, २०२१ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन होते ते पूर्ण करण्यात आले आहे काय,

(४) असल्यास, सदर उर्वरीत ६१.८८ अघफू पाणी वळवण्याबाबतच्या योजनांचे सर्वेक्षण करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी ५२.५० कोटी रुपये किमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कार्यकारी संचालक कोकण पाटबंधारे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षते खालील समितीने सुधारीत शासन निर्णय दिनांक २९/१०/२०२० अन्वये राज्यांतर्गत नदीजोड/प्रवाही वळण योजनांचा प्राधान्यक्रम ठरविणे व त्यासाठी प्रवाही वळण योजनांचे तसेच उपसा वळण योजनांचे मापदंड तयार करुन मराठवाडा प्रदेशात किंवा इतर तुटीच्या प्रदेशात/खोर्यात पाणी वळविण्याकरिता अहवाल तयार करणे याकरिता महासंचालक मेरी, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची स्थापना केली आहे, हे ही खरे काय,

(६) असल्यास, या अभ्यास गटाच्या अहवालानुसार कार्यकारी संचालक कोकण पाटबंधारे विकास महामंडळ व कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळयांच्यात बैठकी घेऊन शासनाने समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्यात आण्यात येणाऱ्या योजनेला चालना देण्यासाठी पुढील कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२४-०५-२०२२) : (१) होय.

(२) होय.

(३) अंशत: खरे आहे.

दमणगंगा-वैतरणा-गोदावरी व दमणगंगा-एकदरे गोदावरी या नदीजोड योजनांचे सविस्तर सर्वेक्षण, अन्वेषण व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकामी राष्ट्रीय जलविकास अभिकरण व जलसंपदा विभाग यांचे दरम्यान झालेल्या सामंजस्य करारानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल डिसेंबर, २०२१ अखेर प्राप्त होणे अपेक्षित होते. तथापि, दमणगंगा (एकदरे) गोदावरी (वाघाड) या नदीजोड योजनेचा प्रारुप प्रकल्प अहवाल क्षेत्रीय मुख्य अभियंता यांना दि.१२/१०/२०२१ च्या पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. तसेच, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी (कडवा देव नदी) या योजनेचा प्रारुप प्रकल्प अहवाल क्षेत्रीय मुख्य अभियंता यांना दि.९/१२/२०२१ च्या पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. सदर दोन्ही प्रारूप प्रकल्प अहवालावरील अभिप्राय राष्ट्रीय जलविकास अभिकरणास क्षेत्रीय स्तरावरून अनुक्रमे दि.१४/१२/२०२१ व दि.०४/०१/२०२२ अन्वये कळविण्यात आलेले आहे. दोन्ही योजनांचा अंतिम सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जलविकास अभिकरणाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी क्षेत्रीय स्तरावरून पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) नाही.

(५) नाही.

शासनाने, शासन निर्णय दि.२९.१०.२०२० अन्वये राज्यांतर्गत नदीजोड/प्रवाही वळण योजनांचा प्राधान्यक्रम ठरविणे व त्यासाठी प्रवाही वळण योजना तसेच उपसा वळण योजनांचे मापदंड तयार करणे, मराठवाडा प्रदेशात किंवा इतर तुटीच्या प्रदेशात/खोऱ्यात पाणी वळविण्याकरीता प्रस्तावित नदी वळण योजनांचा अहवाल तयार करणे करीता महासंचालक, मेरी, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन केला आहे.

(६) शासन निर्णय दि.२९.१०.२०२० अन्वये गठीत अभ्यास गटाने अहवाल शासनास सादर केला आहे. त्यानुसार, पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

वर्धा जिल्ह्यातील शेतकरी कालवे वितरीकेच्या देखभाल व दुरुस्ती अभावी सिंचनापासून वंचित असल्याबाबत

(३४) ४१३२३ (११-०४-२०२२). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी पोहोचविण्याकरिता तयार करण्यात आलेल्या कालवे वितरीकांच्या देखभाल दुरुस्तीकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याने शेतकरी सिंचनापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाट पुनर्वसन प्रकल्प व देखभाल दुरुस्ती प्रकल्पाचे कार्य जानकी देवी बजाज ग्रामविकास संस्थेने हाती घेतले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्‌अनुषंगाने उक्त प्रकल्प देखभाल व दुरुस्तीचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२३-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.

जलसंपदा विभाग, शासन निर्णय दिनांक १७.११.२०१६ नुसार महामंडळाकडून प्राप्त होणाऱ्या पाणीपट्टीच्या निधीतून कालवे व वितरिकेच्या दुरूस्तीची कामे करण्यात येतात.

(२) होय. जानकी देवी बजाज ग्रामविकास संस्थेने Corporate Social Responsibility (CSR) निधीतून पोथरा मध्यम प्रकल्पाच्या चिचघाट वितरीकेच्या १०० हे. क्षेत्रात पाट पुर्नवसन प्रकल्पाअंतर्गत देखभाल दुरूस्तीची आवश्यक कामे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये पूर्ण केलेली आहे. सन २०२०-२१ मध्ये चिचघाट वितरीकेवर ८७ हे सिंचन करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

उस्मानाबाद जिल्हयाच्या संर्वागीन विकासाच्यादृष्टीने निती आयोगाच्या निर्देशांकानुसार करावयाच्या उपाययोजनांबाबत

(३५) ४१३३८ (११-०४-२०२२). डॉ.तानाजी सावंत (परांडा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चार जिल्हयांपैकी उस्मानाबाद हा एक अकांक्षित जिल्हा असून त्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या निती आयोगाने निश्चीत केलेल्या निर्देशांची उद्दिष्टपूर्ती करण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने नव्याने सर्वांकश आराखडा ३ आठवडयांत तयार करुन पाठविण्याचे निर्देश केंद्रीय अर्थ राज्यमंत्री महोदयांनी दिनांक २८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयातील शिक्षण, आरोग्य, अर्थ, कौशल्य विकास व्हावा या दृष्टीने शासनाच्या स्तरावरुन काही धोरण निश्चीत करण्यात आली आहेत काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने उस्मानाबाद जिल्हयाच्या संर्वागीन विकासाच्यादृष्टीने निती आयोगाच्या निर्देशानुसार आराखडा तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (२३-०५-२०२२) : (१) होय, आकांक्षित जिल्हा कार्यक्रमांतर्गत आर्थिक समावेशन आणि डिजिटल व्यवहार या क्षेत्रासाठी निश्चित केलेल्या निर्देशांकाची उद्दिष्टपूर्ती करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने नव्याने सर्वकष आराखडा तयार करुन पाठविण्याबाबत दि. २८ जानेवारी, २०२२ च्या व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये चर्चा झाली आहे.

(२), (३) व (४) केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी "आकांक्षित जिल्हा कार्यक्रम" या कार्यक्रमांतर्गत देशातील ११२ जिल्ह्यांचा कायापालट करण्यासाठी (I) आरोग्य व पोषण (ii) शिक्षण (iii) कृषि आणि जलसंपदा (iv) कौशल्य विकास आणि आर्थिक समावेशन आणि (v) पायाभूत सुविधा या ५ क्षेत्रातील प्रगतीची नोंद ४९ प्रमुख कामगिरी निर्देशक व ८१ Delta Points मधील कामगिरीच्या आधारे "चॅम्पियन्स ऑफ चेंज" या डॅशबोर्डवर नोंदविण्यात येते. उस्मानाबाद जिल्हयाने नोव्हेंबर, २०२१ या महिन्यातील कामगिरीच्या आधारे कृषि व जलसंपदा या क्षेत्रात अव्वल क्रमांक मिळविला असल्याने रु. ३.०० कोटी इतका निधी बक्षिसाच्या रुपाने नीति आयोगाकडून प्राप्त झालेला आहे. प्राप्त झालेल्या निधी वितरणासाठी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी नीति आयोगास प्रस्ताव सादर केलेले आहे.

चंद्रपूर जिल्हयातील द्वारका पॅलेस, जेल रोड कोतवाली वार्ड येथील संकुलात बीयर शॉपीचा परवानाचा प्रस्ताव नामंजूर करण्याबाबत

(३६) ४१३८४ (१२-०४-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील द्वारका पॅलेस, जेल रोड कोतवाली वार्ड येथील संकुलात बीयर शॉपीचा परवाना मिळण्याबाबतचा प्रस्ताव नामंजूर करण्याबाबत मा.विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना दिनांक १० जानेवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (१९-०५-२०२२) : (१) सदर प्रकरणी मा.विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि.चंद्रपूर यांचे दि.१०.१.२०२२ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, चंद्रपूर शहर यांनी चौकशी करुन अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानुसार संबंधित संकुलातील रहिवाश्यांचे जबाब नोंदविण्यात आले असून प्रस्तावित बीअर शॉपी नियमानुसार अंतरनिर्बंधमुक्त असल्याचे आढळून आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

सुलतानपूर (ता.लोणार, जि. बुलढाणा) येथील आरोग्यकेंद्रात आकृतीबंधानुसार आरोग्यसेवकांच्या पदांची निर्मितीच नसल्याबाबत

(३७) ४१४३३ (२४-०४-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)सुलतानपूर (ता.लोणार,जि.बुलढाणा) येथील आरोग्य केंद्रात आकृतीबंधानुसार आरोग्यसेवकांच्या पदांची निर्मिती केली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पदांची निर्मिती न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०५-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) आकृतीबंधानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रास आरोग्य सेवकाचे पद मंजुर नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

खोची-दुधगाव दरम्यान (जि.कोल्हापूर) वारणा नदीवर असणाऱ्या बंधाऱ्याची दुरावस्था झाल्याबाबत

(३८) ४१७३७ (१२-०४-२०२२). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोची-दुधगाव दरम्यान (जि.कोल्हापूर) वारणा नदीवर असणाऱ्या बंधाऱ्यांची अवस्था अत्यंत बिकट असल्याने अनेकदा अवजड वाहतूक बंद करण्यात आली असून गेल्या १५

दिवसांपूर्वी रस्त्याच्या दोन्ही बाजूला दोन दोन चरी मारल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, त्यानुसार उक्त नदीवर असलेल्या बंधाऱ्यांची दुरुस्ती करुन वाहतूक सुरळीत सुरु राहण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१३-०५-२०२२) : (१) होय,

(२) होय,

सदर बंधाऱ्याची मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे यांनी दि.०४/०७/२०२१ रोजी प्रत्यक्ष क्षेत्रीय स्थळावर भेट देऊन पाहणी केली होती. सदर भेटीत दिलेल्या सूचनांनुसार या बंधाऱ्याच्या दुरूस्तीसाठी आवश्यक सर्व तरतुदींचा समावेश असलेल्या अंदाजपत्रकास शासन निर्णय दि.२१/०२/२०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत या बंधाऱ्याच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देणेबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

पुणे शहराच्या पाणी कपातीबाबत

(३९) ४२३२२ (०१-०४-२०२२). श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराची पाण्याची मागणी सुमारे १७ TMC असताना जलसंपदा विभागाने ३० जून २०२२ पर्यंत शहराला १०.९० TMC इतका पाणीसाठा मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शहराची दररोजची पाण्याची गरज ही सुमारे १४०० MLD इतकी असते परंतू जलसंपदा विभागाने दिलेल्या आदेशानुसार शहराला दररोज ८४५ MLD इतके पाणी मिळणार आहे, तसेच धरणे पूर्ण भरलेली असतानाही पुणे शहराला १७ TMC ची गरज असताना देखील शहराला १०.९० TMC इतका पाणीसाठा मंजूर करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त मंजूर कोट्यानुसार शहराला पाणीपुरवठा करायचा ठरवल्यास शहरात पाणीकपातीची शक्यता निर्माण होईल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने पुणे शहराला वाढीव पाणीसाठा मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२४-०५-२०२२) : (१) अंशतः खरे आहे

पुणे महानगरपालिकेस खडकवासला, पवना व भामा आसखेड धरणातुन सन २०३१ च्या भविष्यकालीन ७६.१६ लक्ष लोकसंख्येस वार्षिक एकूण १४.६१ TMC पाणी आरक्षण मंजूर आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशानुसार महानगरपालिकेने दरवर्षी लोकसंख्या प्रमाणित करून मापदंडानुसार वार्षिक पाण्याचे अंदाजपत्रक (Water Budget) सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिकेने दि.०५.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या ६०.२७ लक्ष लोकसंख्येसाठी MWRRA च्या पिण्याच्या पाणीवापराच्या मापदंडास अनुसरुन सन २०२१-२२ (१ जुलै २०२१ ते ३० जुन २०२२) करिता पुणे शहरास १०.९० TMC (८४५.९६ MLD) इतका पाणीवापर मंजूर केलेला आहे.

(२) सद्यस्थितीत पुणे महानगरपालिकेस खडकवासला, पवना व भामा आसखेड धरणातुन एकुण १४.६१ TMC पाणी आरक्षण मंजूर केले आहे.

तथापि पुणे महानगरपालिका जलसंपदा विभागाच्या विविध प्रकल्पातून माहे-नोव्हेंबर २०२० पासूनच्या वापरानुसार खालीलप्रमाणे सरासरी दैनंदिन पाणीवापर करीत आहे.

धरणाचे नाव	पुणे म.न.पा.सध्या करीत असलेला सरासरी दैनंदीन पाणी वापर (MLD)
१. खडकवासला	
धरणातून	१४१९
कालव्यातून	१६४
२. पवना	३२
३. भामा आसखेड	११८
एकुण	**१७३२**

१७३२ MLD या दैनंदिन पाणी वापरानुसार वार्षिक पाणीवापर २२.३२ TMC इतका होतो.

(३) पुणे महानगरपालिका सद्यस्थितीत महानगरपालिकेस मंजूर वार्षिक पाण्याचे अंदाजपत्रक (Water Budget) १०.९० TMC पेक्षा जास्त प्रमाणात म्हणजेच २२.३२ TMC इतका जास्तीचा पाणीवापर करीत आहे. पुणे महानगरपालिकेस वारंवार सूचित करूनही महानगरपालिकेचा पाणीवापर नियंत्रित / कमी केला गेलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बीड जिल्हयातील आरोग्य विभागाच्या कार्यालयाकडून सर्व प्रकारच्या खरेदीच्या मूळ कागदपत्रासहित तपशील देणेबाबत

(४०) ४२४३४ (२४-०४-२०२२). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील आरोग्य विभागाच्या कार्यालयाकडून सर्व प्रकारच्या खरेदीच्या मूळ कागदपत्रासहित तपशील देणेबाबत आरोग्य विभागाच्या कार्यालयात दि.२४/०९/२०२१, दि.१९/१०/२०२१ यापुर्वी सुध्दा पत्रव्यवहार केलेला आहे परंतू संपूर्ण कामाचा तपशील अद्यापपर्यंत दिलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आपल्या कार्यालयाच्या अधिनस्त कार्यालयाने झेडपीआर, जिल्हा वार्षिक योजना साथरोग (कोरोना) लेखाशीर्ष-२२१० ई ६५१ व ६४२ या अंतर्गत सर्व प्रकारचे औषधीसहित साधनसामुग्री खरेदी करताना कोणते बिल लावण्यात आलेले आहे, मान्यता कशा घेतलेल्या आहेत व यासर्व बाबींचा लेखापरिक्षण अहवाल, कोटेशन जेम्स पोर्टल, गर्व्हमेंट रेट कॉन्ट्रॅक्ट सर्व स्तरातील निविदा यातील सर्व प्रकारच्या संचीका कागदपत्रासहीत अद्याप उपलब्ध करुन दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या खरेदीमध्ये काही अनियमितता आढळून आली असून त्यातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१३-०५-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.
जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाचे दि.०४.१०.२०२१ व दि.०८.११.२०२१ च्या पत्रान्वये आरोग्य विभाग जिल्हापरिषदे मार्फत खरेदीप्रक्रिया बाबतच्या कागदपत्रांच्या छायाकिंत प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.
(३) प्रस्तुत प्रकरणी अनियमितता झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे कोथळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार विजेता निलेश भिल यांच्या पुनवर्सनाबाबत

(४१) ४२५६२ (१२-०४-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कोथळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार विजेता निलेश भिल यांचे शिक्षण अर्धवट राहिले असून त्याच्यावर कौटूंबिक जबाबदारी आली असल्याचे माहे दिनाक २६ जानेवारी, २०२२ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुरस्कार प्राप्त युवकाला घर व शिक्षणासाठी शासनाची मदत होणार असल्याचे समजले असून देखील अदयाप गेल्या सहा वर्षात घर व शिक्षणासाठी कोणताही प्रकारची मदत देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निलेश भील यांना घर व रोजगार मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (१३-०५-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.
सदर बालकाचे शिक्षण अर्धवट सुटलेले आहे, मात्र कौटुंबिक जबाबदारी घेण्यासाठी बालकाचे पालक हयात आहेत.

(२) राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार विजेता निलेश भिल यास घरकुल योजनेंतर्गत घरकुल मिळवून देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जळगाव यांना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जळगाव यांचे स्तरावरुन कळविण्यात आले आहे.
तसेच निलेश भिल यास आश्रमशाळेमध्ये प्रवेश देण्याबाबत मुख्याध्यापक, आदिवासी आश्रमशाळा, मुक्ताईनगर यांना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जळगाव यांनी पत्राव्दारे कळविले आहे.
(३) राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार विजेता निलेश भिल याचे सद्य:स्थितीत वय १६ वर्षे ९ महिने असल्यामुळे त्याचे वय व शिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्राधान्याने त्याला रोजगार मिळवून देण्याबाबतचे प्रयत्न आदिवासी विकास विभागाकडून करण्यात येतील, असे आदिवासी प्रकल्प अधिकारी, यावल यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सिरसम बु. (ता.जि.हिंगोली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत

(४२) ४२५९८ (१२-०४-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिरसम बु. (ता.जि.हिंगोली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मागील १६ वर्षापासून आरोग्य सहाय्यकासह इतर ६ कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे स्थानिक नागरीकांच्या आरोग्यसेवेवर परिणाम होत असून रुग्णालयात तपासणीसाठी आलेल्या रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन रिक्त असलेली सर्व पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (२०-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) ग्राम विकास विभागाच्या दि.२०.०८.२०२१ व दि.०१.०९.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषद आरोग्य विभागातील गट क संवर्गाची औषध निर्माण अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सहायक (पु) आरोग्य सहाय्यक (स्त्री) या संवर्गातील पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. ग्रामविकास विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पदभरतीची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

भंडारा जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रातील पदे रिक्त भरण्याबाबत

(४३) ४२६८३ (२४-०४-२०२२). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व आरोग्य केंद्रामध्ये डॉक्टर, परिचारिका, फार्मसिस्ट, फिजिओथेरपिस्ट तसेच वर्ग-३ व वर्ग-४ या संवर्गातील विविध पदे मागील अनेक वर्षापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे जिल्ह्यातील जनतेला आरोग्यविषयक सोयीसुविधा वेळेवर उपलब्ध होत नसल्याने अनेक रुग्णांचा मृत्यू होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (२६-०५-२०२२) : (१) हे अशंत: खरे आहे.

जिल्हा परिषद स्तरावरील गट अ व गट ब संवर्गातील एकणू मंजूर ११६ पदांपैकी ९५ नियमित, ०२ बंधपत्रित व ०५ कंत्राटी तत्वावर पदे भरण्यात आलेली असून एकूण १४ पदे रिक्त आहेत. राज्यस्तरीय गट क व ड संवर्गातील एकूण मंजूर ८३७ पदांपैकी ६२४ पदे भरलेली आहेत. तसेच गट क व ड सवंर्गातील एकूण मंजूर ७०८ पदांपैकी ४५९ पदे भरलेली आहेत.

(२) प्राप्त अहवालानुसार उपलब्ध मनुष्यबळाद्वारे रुग्णांना नियमितपणे वेळीच रुग्ण सुविधा पुरविली जाते. तसेच, सोयीसुविधा वेळेवर उपलब्ध होत नसल्याने रुग्णांचा मृत्यू झालेला नाही.

(३) १. आरोग्य संस्थामध्ये विशेषज्ञांचे पद रिक्त असले तरी आयपीएचएस अंतर्गत विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी तसेच ज्या रुग्णलयात विशेष तज्ञ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नाहीत त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात राष्ट्रीय आरोग्य अभियांनांतर्गत तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

२. तसेच शासन निर्णय क्र. मवैअ-१०५४ /प्र.क्र.२४१ /भाग-१ /सेवा-३, दि.०३.१२.२०१८ अन्वये राजपत्रित वैद्यकीय अधिकारी व विशेषज्ञांची पदे जिल्हास्तरावर भरणेबाबत निर्देश असल्याने रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात येतात. तसेच शासन परिपत्रक क्र. मवैअ १०५४ /प्र.क्र.२४१ /भाग२/सेवा-३, दि.०४.०७.२०१९ अन्वये वैद्यकीय अधिकारी, गट- अ पदावर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणून बी.ए.एम.एस. अहर्ताधारकांना वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्ती देण्याबाबत निर्देश असल्याने त्यानुसार रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात आलेले आहेत.

३. संचालनालयामार्फत प्राप्त होणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेले एम.बी.बी.एस. अहर्ताधारक उमदेवारांना बंधपत्रित वैद्यकीय अधिकाऱ्यांना ग्रामीण भागातील आवश्यकतेनुसार रुग्णसेवा सुरळीत ठेवण्याच्या दृष्टिने एक वर्षाचे कालावधीसाठी बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी गट -अ या पदावर नियुक्ती देण्यात येत आहे.

४. गट क व ड संवर्गातील रिक्त पदे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी तत्वावर भरून तसेच अतिरिक्त कार्यभार देवून रुग्णसेवा सुरळीत देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

निरा उजवा कालवा माळशिरस व माचणूर (जि.सोलापूर) उपविभागीय कार्यालयांतर्गत येणारी रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत

(४४) ४३३५९ (०१-०४-२०२२). श्री.राम सातपुते (माळशिरस) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळशिरस व माचणूर (जि.सोलापूर) निरा उजवा कालवा उपविभागीय कार्यालयांतर्गत येणारी रिक्त पदे तातडीने भरण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (माळशिरस) यांनी जलसंपदा मंत्री यांना दिनांक १३.१२.२०२१ रोजी वा त्यासुमारास दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय निदर्शनास आले, तद्अनुषंगाने सदर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१३-०५-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नीरा उजवा कालवा विभाग, फलटण अंतर्गत माळशिरस उपविभागांतर्गत एकूण १०१ पदे मंजूर असून २१ अधिकारी/ कर्मचारी कार्यरत आहेत व माचनूर उपविभागांतर्गत एकूण १०१ पदे मंजूर असून २४ अधिकारी/ कर्मचारी कार्यरत आहेत. वित्त विभाग शासन निर्णय दि.२५.७.२०१७ मधील तरतुदीनुसार, जलसंपदा विभागाचा आकृतीबंध अंतिम झाला नसल्याने, विभागाच्या गट-क व गट-ड संवर्गातील सरळसेवेच्या पदभरतीवर निर्बंध आहेत. तथापि, सामान्य प्रशासन विभागाच्या प्रचलित धोरणानुसार, गट-क व गट-ड संवर्गातील प्रतिवर्षी सरळसेवेच्या रिक्त होणाऱ्या पदांच्या २० टक्के पदे अनुकंपा तत्वावर भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बाभूळगाव (जिल्हा सोलापूर) येथील माळशिरस मतदार संघातील पाटबंधारे खात्याची वापरात नसलेली विहीर पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामपंचायतीकडे वर्ग करणेबाबत

(४५) ४३३६३ (०१-०४-२०२२). श्री.राम सातपुते (माळशिरस) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभूळगाव (जिल्हा सोलापूर) येथील माळशिरस मतदार संघातील पाटबंधारे खात्याची वापरात नसलेली विहीर पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामपंचायतीकडे वर्ग करणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (माळशिरस) यांनी मा.जलसंपदा मंत्री, यांना दिनांक ०७.०९.२०२१ रोजी वा त्यासुमारास दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२४-०५-२०२२) : (१) होय.

(२) सदर प्रकरणी चौकशी सुरु आहे,

सदर विहीर मौजे बाभूळगाव, ता.माळशिरस येथील गेट नं.८ मध्ये आहे. सदर विहिरीवरील उपसा सिंचन योजनेचे लाभक्षेत्र हे उजनी उजव्या कालव्यावरील लाभक्षेत्रामध्ये समाविष्ठ झाल्याने ही योजना बंद पडली आहे.

ही योजना बंद असल्याने या योजनेकरिता जलसंपदा खात्याने संपादित केलेले क्षेत्र व विहीर आता स्थानिक ग्रामपंचायतीस पाणीपुरवठा योजनेकरिता हस्तांतरण करुन देणेबाबत शासन नियमानुसार कार्यवाही करणेत येत असून, याबाबतचा प्रस्ताव नियामक मंडळास सादर करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

जिल्हा नियोजन समिती, सांगली यांच्याकडून जिल्हा परिषदेला मिळालेला सदरील निधी योग्य वेळेत खर्च न झाल्याबाबत

(४६) ४३५८३ (११-०४-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा नियोजन समिती, सांगली यांच्याकडून जिल्हा परिषदेला मिळालेल्या १४३ कोटी रुपयांपैकी केवळ ३९ टक्के खर्च झाला असून मार्च अखेर दोन महिन्यात उर्वरित ६१ टक्के निधी वेळेत कशा प्रकारे खर्च केला जाणार आहे,

(२) असल्यास, सदरील निधीअंतर्गत असलेल्या कामांचे प्रशासकीय कामकाज पूर्ण होण्यास सुमारे ८-१० महिन्यांचा कालावधीत लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्‌अनुषंगाने सदरील निधी योग्य वेळेत खर्च न केल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (१२-०५-२०२२) : (१) व (२) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२१-२२ अंतर्गत जिल्हा परिषदेला रुपये १७३.९७ कोटी प्राप्त झाले असून दिनांक ३१/०३/२०२२ पर्यंत रुपये ६३.१३ कोटी निधी खर्च झाला आहे. वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ०६/०६/२००८ मधील तरतूदीनुसार जिल्हा परिषदेला वितरीत केलेला निधी दिनांक ३१/०३/२०२३ पर्यंत खर्च करावयाचा आहे. सदरच्या शिल्लक निधीमधील कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. प्रस्तावित कामांचे कार्यारंभ आदेश, पुरवठा आदेश तसेच लाभार्थी निवड प्रक्रिया इ. पूर्ण केलेली असून कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

कल्याण पश्चिम परिसरात अवैध दारूची मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्याबाबत

(४७) ४३६७६ (१२-०४-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण पश्चिम (जि. ठाणे) ढाबे, पानपट्टी, चायनीजच्या गाड्यांवर राजरोसपणे अवैध दारू विक्री करत असल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाच्या दुर्लक्षामुळे सदर अवैध दारू विक्री होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, उक्त परिसरात होणारी अवैध दारूविक्री बंद करण्याबाबत तसेच दुर्लक्ष करणाऱ्या राज्य उत्पादन शुल्क यांच्या संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (१९-०५-२०२२) : (१), (२), (३) व (४) अवैध दारु निर्मिती, वाहतूक व विक्रीसंदर्भात राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत कठोर कारवाई करण्यात येते.

ठाणे जिल्ह्यामधील कार्यक्षेत्रीय निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कल्याण यांनी माहे डिसेंबर, २०२१ या महिन्यामध्ये कल्याण पश्चिम परिसरात कारवाई करुन अवैध देशी व विदेशी बेकायदेशीर मद्य विक्री करणारे धाबे यावर ९ गुन्हे, तसेच बेकायदेशीर गावठी दारु विक्री करणा-यांवर ७ गुन्हे, विनापरवाना ताडी विक्री करणाऱ्या ठिकाणावर १ गुन्हा व हातभट्टी विक्री करणाऱ्या ठिकाणांवर २ गुन्हे असे एकूण १९ गुन्हे नोंदविले आहेत. त्यामध्ये रु.६१,१९८/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

तसेच, अवैध दारु निर्मिती, वाहतूक व विक्रीसंदर्भात खालीलप्रमाणे नियमित कारवाई केली जाते.

१. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, ठाणे यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय अधिका-यांचे कार्यक्षेत्र बदलून प्रत्येक आठवड्यात किमान २ मोहिमा राबविण्यात येतात.

२. अवैध मद्य विक्रीवर निर्बंध घालण्याकामी वेळोवेळी वाहनांची तपासणी केली जाते व रात्रीच्या वेळी गस्ती घालण्यात येतात.

३. हातभट्टी निर्मिती केंद्राच्या ठिकाणी विभागाचे संबंधित कार्यक्षेत्रीय निरीक्षक, तसेच, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, ठाणे यांचेकडून वारंवार धाडी टाकून संबंधितांवर महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ अंतर्गत गुन्हे नोंद केले जातात.

४. सराईत गुन्हेगारांकडून कलम ९३ अंतर्गत बंधपत्र घेण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

उमरेड (जि.नागपूर) विधानसभा क्षेत्रातील अपूरी सिंचन सुविधा पुरविणेबाबत

(४८) ४३७१५ (०१-०४-२०२२). श्री.राजु पारवे (उमरेड) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुर्व विदर्भाची जीवनदायीनी असणाऱ्या वैनगंगा नदीवर भंडारा जिल्ह्याच्या पवनी तालुक्यातील गोसीखुर्द गावाजवळ २,५०,५०० हे. सिंचन क्षेत्र असलेला गोसीखुर्द राष्ट्रीय

प्रकल्पाचे बांधकाम करण्यात येत आहे. प्रकल्पामुळे नागपूर जिल्ह्यातील १०८ गावे व भंडारा जिल्ह्यातील ७३ गावे बाधीत होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ४० टक्के पाण्याचा महाराष्ट्र राज्याला उपयोग न होता इतर राज्यात वाहूण जाणार आहे हे माहित असूनही शासनाने यावर कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी नवीन प्रस्ताव केले आहेत काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्दअनुषंगाने सदर विधानसभा क्षेत्रातील अपूरी सिंचन सुविधा पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (०४-०५-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

गोसिखुर्द प्रकल्पामूळे नागपूर जिल्ह्यातील एकूण ७९ गावे (पुर्णत: ५१ + २८ अंशत:) तसेच भंडारा जिल्ह्यातील एकूण १०४ गावे (३४ पुर्णत: + ७० अंशत:) बाधित होत आहे.

(२) गोसीखुर्द प्रकल्पाच्या मंजुर पाणीवापरानुसार अपेक्षित पाणीसाठा व वापर करण्यात येत आहे.

(३) पूर्व विदर्भातून वाहणाऱ्या वैंनगंगा नदीच्या पाण्याचा जास्तीत जास्त उपयोग महाराष्ट्र राज्याला होण्याच्या दृष्टीने वैंनगंगा-नळगंगा योजना प्रस्तावित आहे.

(४) वैंनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवालाच्या छाननीचे काम राज्य तांत्रिक सल्लागार समिती नाशिक यांच्यामार्फत प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे फलवणी, काळमवाडी, बचेरी (ता. माळशिरस, जि.सोलापूर) येथील रस्त्यांच्या कालव्यावर पूल मंजूर होणेबाबत

(४९) ४३९२० (०१-०४-२०२२). श्री.राम सातपुते (माळशिरस) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे फलवणी, काळमवाडी, बचेरी (ता. माळशिरस, जि.सोलापूर) येथील ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये रस्त्यावरुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळेमध्ये १७५ विद्यार्थी शिकत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त हद्दीमधून गावकरी, शेतकरी सतत ये-जा करत असतात व काळमवाडी, बचेरीतील नागरिकांना ७ ते ८ कि.मी. अंतरावरुन ये-जा करावी लागत असल्याने विद्यार्थी व गावकरी यांची गैरसोय होत असल्याने नीरा उजवा कालव्यावर पूल व्हावा अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मौजे फळवणी, काळमवाडी, बचेरी येथील रस्त्यांच्या कालव्यावर पूल मंजूर होणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (माळशिरस) यांनी मा.जलसंपदा मंत्री, यांना दिनांक ०१.१२.२०२१ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्‌अनुषंगाने सदर रस्त्यांच्या कालव्यावरुन पूल तयार करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२०-०५-२०२२) : (१) होय,
(२) होय,
(३) होय,
(४) हे खरे नाही.
(५) प्रस्तावित पुलाच्या वरील बाजूस २०० मी. अंतरावर साखळी क्र.१४६/९०० कि.मी. येथे पूल आहे. तसेच प्रस्तावित पुलाच्या खालील बाजूस १.१० कि.मी. अंतरावर सा.क्र.१४८/२०० येथे पूल आहे. त्यामुळे काळमवाडी, बचेरीतील नागरिकांना ७ ते ८ कि.मी. अंतरावरून ये-जा करावी लागते अशी वस्तुस्थिती नाही.
Manual of Standard Designs of Canal Structures (Govt.Circular no.MIP २२६०/१३०-IP (१) dt.०४.०३.१९६१) नुसार कालव्यावरील २ पूलांमधील अंतर २ मैल (३.२२ कि.मी.) पेक्षा कमी नसावे, असे नमूद आहे. मागणी केलेल्या प्रस्तावित पुलाचे ठिकाण हे २ मैल (३.२२कि.मी.) पेक्षा कमी अंतरावर असल्याने सदर ठिकाणी पूलाचे बांधकाम करणे नियमोचित नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या कर्ज परतावा योजनेत इरादा पत्र मिळत नसल्याबाबत

(५०) ४४५०५ (२५-०४-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मराठा समाजातील नव उद्योजकांना मदतीचा हात देण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून कर्ज परतावा योजना सुरू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या कर्ज परतावा योजनेत इरादा पत्र (लेटर ऑफ इंटेन्ट, एलओआय) मिळत नसल्याने एक लाखावर मराठा उद्योजकांना नवीन प्रस्ताव सादर करण्याच्या प्रक्रियते खोळंबा होत असल्याची बाब १५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तांत्रिक कारण पुढे करत सदर योजनेचे लाभार्थी न वाढवण्याचा प्रयत्न केला जात असल्याची भावना मराठा उद्योजकांमध्ये निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर महामंडळाला एक हजार कोटी रुपयांच्या निधीची मागणी असताना केवळ काही कोटी रुपयांची तरतूद केल्याने लाभार्थ्यांच्या संख्येवर मर्यादा येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अनेक दिवसापासून प्रलंबित असलेले इरादा पत्र (एलओआय) मिळण्यासाठीचा प्रस्ताव तातडीने मंजूर करणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (१८-०५-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.

महामंडळाच्या योजनेचे संपूर्ण कामकाज ऑनलाईन प्रणालीमार्फत राबविण्यात येते. आवश्यक दस्तऐवज तसेच अटी व शर्तीनुसार परिपूर्ण प्रकरणांना महामंडळ मान्यता देते. मान्य झालेल्या प्रकरणांना system मार्फत L.O.I. प्राप्त होतो. सदर प्रक्रिया शासन निर्णयानुसार निरंतर चालू असून, महामंडळ प्राप्त नवीन प्रकरणांना ७ दिवसात कार्यवाही करुन निर्णय घेते.

सन २०२० पासून ट्रॅक्टर व इतर वाहनाचे अर्जाचे प्रमाण जास्त झाले आहे. लाभार्थ्यांना ट्रॅक्टर डीलर्स मार्फत होत असलेली फसवणूक व गैरव्यवहार टाळण्यासाठी याबाबत ऑडिट व महामंडळाच्या स्तरावर पडताळणी सुरु आहे या कारणास्तव दिनांक १५ जानेवारी, २०२२ पासून वाहन व ट्रॅक्टर संबंधित काही प्रकरणे स्थगित ठेवण्यात आली आहेत.
(३) नाही, हे खरे नाही,
महामंडळाची वेब प्रणाली निरंतर चालू असून यात कोणताही खंड आलेला नाही.
(४) महामंडळ आवश्यकतेनुसार शासनाकडे निधीची मागणी करीत आहे. त्यानुसार महामंडळास शासन निधी पुरवीत आहे.
(५) महामंडळाच्या स्तरावर एल.ओ.आय.करीता नवीन प्राप्त झालेल्या प्रकरणांवर ७ दिवसांच्या आत कार्यवाही होते. सद्यस्थितीत ३६ जिह्यातून २६०४ प्रकरणे एल.ओ.आय करीता प्राप्त आहेत.

ट्रॅक्टर व इतर वाहनांच्या स्थगित प्रकरणांची पडताळणी पूर्ण झाल्यावर त्याबाबत निर्णय घेण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **राजेन्द्र भागवत**
मुंबई. **प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.